# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र.:- १५** **// विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.२५/०९/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२५/०९/२०१९ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ. सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| **सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर** | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| शिंदे गायत्री उत्तम | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| बाविस्कर किशोर रमेश | शेख हसीनाबी शरीफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | पाटील कुलभुषण विरभान | भंगाळे विष्णु रामदास |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | बरडे नितीन मनोहर |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | महाजन सुनिल सुपडू |
| चौधरी मंगला संजय | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | राणे गायत्री इंद्रजित | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे धिरज मुरलीधर | तायडे सुरेखा नितीन | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे दिपमाला मनोज | चव्हाण ज्योती बाळासाहेब | शेख सैईदा युसुफ |
| पाटील सचिन भिमराव | मराठे जितेंद्र भगवान | **स्विकृत सदस्य** |
| पाटील प्रतिभा सुधीर | पाटील रेखा चुडामण | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | सोनवणे सुरेखा सुदाम | चौधरी महेश रतन |
| कापसे मयुर चंद्रकांत | पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा.उपायुक्त, श्री. अजित मुठे, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

* वंदेमातरमने सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** मा.महापौर, सर्व सन्मा.सदस्य, पदाधिकारी यांना नमस्कार, आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्या कोल्हे सिंधु विजय यांचा रजेचा अर्ज आलेला आहे तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीनुसार दि.०१/१०/२०१९ रोजी स्थायी समितीतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) व कलम ३१ अ (१) व (२)मधिल तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवुन स्थायी समितीवर ८ (आठ) सदस्यांचे नामनिर्देशनव्दारे नियुक्ती करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीनुसार स्थायी समितीत एकूण १६ सदस्यांचा समावेश असतो त्यानुसार महासभा ठराव क्रं.०१ दि.११/१०/२०१८ अन्वये स्थायी समितीचे गठन करण्यात आले होते.

अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीनुसार स्थायी समितीचे निम्मे सदस्य दरवर्षी निवृत्त करण्याची तरतूद आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१८ नंतर स्थायी समितीतून सदस्य निवृत्त करणेची प्रथम वेळ असल्यामुळे कलम २०(३) चे तरतुदीनुसार स्थायी समितीत सभापती ठरवतील अशावेळी व सभापती ठरवतील त्या रितीने चिठ्ठया टाकून निवृत्त होणारे सदस्य ठरविण्यात येतील व त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीत जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते सदस्य निवृत्त होतील अशी तरतूद आहे.

सदर तरतूदीस अनुसरुन दि.१७/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीच्या सभेत चिठ्ठया टाकून दि.१/१०/२०१९ रोजी निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नांवे निश्चित करुन स्थायी समिती ठराव क्रं.१६८ दि.१७/०९/२०१९ अन्वये स्थायी समितीतून ८ सदस्य निवृत्त करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन त्यानुसार दि.१/१०/२०१९ रोजी दुपारी स्थायी समितीतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नांवे वाचून दाखविण्यात येत आहे,

१ पाटील प्रतिभा सुधिर — २ सोनवणे सुरेश माणिक
३ बेंडाळे उज्वला मोहन — ४ लढ्ढा नितिन बालमुकूंद
५ मराठे जितेंद्र भगवानराव — ६ कापसे मयुर चंद्रकांत
७ बरडे नितीन मनोहर — ८ बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम

स्थायी समितीतून निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर नवीन आठ सदस्य नामनिर्देशनाने नियुक्त करणेसाठी अधिनियमाच्या कलम ३१अ (१) व (२) चे तरतूदीनुसार महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवून प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशव्दारे सदस्य नियुक्त करण्याची तरतूद असुन सदर तरतूदीनुसार चर्चा करण्यासाठी मा.महापौर यांनी दि.२०/०९/२०१९ रोजी त्यांचे दालनात महापालिकेतील गटनेत्यांची बैठक बोलविलेली होती. पक्षीय बलाबल लक्षात घेवुन स्थायी समितीत भा.ज.पा. तर्फे ०५ शिवसेना पक्षा तर्फे ०२ व एम.आय.एम.पक्षा तर्फे ०१ सदस्य नामनिर्देशित करणे संबंधात सहमती झालेली असुन त्यानुसार भा.ज.पा., शिवसेना व एम.आय.एम. तर्फे स्वाक्षरीचे पत्र प्राप्त झाले असुन त्यानुसार स्थायी समिती सदस्य पदासाठी :,

भा.ज.पा. तर्फे प्राप्त झालेली नांवे :- १) दारकुंडे नवनाथ विश्वनाथ, २) सोनवणे मुकूंदा भागवत, ३) पाटील राजेंद्र झिपरु, ४) देशमुख प्रतिभा गजानन, ५) काळे रेश्मा कुंदन

शिवसेना तर्फे प्राप्त झालेली नांव :-. १) लढ्ढा नितीन बालमुकूंद, २) बरडे नितीन मनोहर

एम.आय.एम तर्फे प्राप्त झालेली नांव :- १)शेख सैईदा युसुफ

**मा.महापौर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार स्थायी समितीवर आठ सदस्य नामनिर्देशित करणे कामी पक्षीय बलाबलानुसार गटनेत्यांकडुन मुदतीत स्थायी समितीवर पुढील प्रमाणे आठ सदस्यांचे नामनिर्देशन करणे बाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे. स्थायी समितीमधून निवृत्त झालेल्या आठ सदस्यांचे जागेवर तेवढयाच सदस्यांची नांवे प्राप्त झालेली असल्याने खालील नमूद सदस्यांची नामनिर्देशनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व स्थायी समिती सदस्यपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात येत आहे.

१) दारकुंडे नवनाथ विश्वनाथ — २) सोनवणे मुकूंदा भागवत
३) पाटील राजेंद्र झिपरु — ४) देशमुख प्रतिभा गजानन
५) काळे रेश्मा कुंदन — ६) लढ्ढा नितीन बालमुकूंद
७) बरडे नितीन मनोहर — ८) शेख सैईदा युसुफ

**नगरसचिव :-** जळगांव शहर महानगरपालिकेने गठीत केलेल्या महिला व बालकल्याण समितीची मुदत दि.१०/१०/२०१९ रोजी संपत असल्याने महिला व बालकल्याण समितीचे गठनासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० (१) व (१-अ) तसेच कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळ लक्षात घेवुन महिला व बालकल्याण समितीवर नऊ (९) सदस्यांचे नामनिर्देशनव्दारे नियुक्ती करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० (१) मधिल तरतुदीनुसार महासभा ठराव क्रं.०२ दि.११/१०/२०१८ अन्वये महिला व बालकल्याण समितीचे गठन करण्यात आलेले होते. महिला व बालकल्याण समिती सदस्यांची मुदत दि.१०/१०/२०१९ रोजी संपत असल्याने महिला व बालकल्याण समिती पुर्नगठीत करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ३१ (अ)(१) व (२) चे तरतूदीनुसार चर्चा करणेसाठी मा.महापौर यांनी दि.२०/०९/२०१९ रोजी त्यांचे दालनात महापालिकेतील गटनेते, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता यांची बैठक बोलविलेली होती. पक्षीय बलाबल लक्षात घेवुन महिला व बालकल्याण समितीत भा.ज.पा. तर्फे ०७ व शिवसेना पक्षा तर्फे ०२ सदस्य नामनिर्देशित करणे संबंधात सहमती झालेली असुन त्यानुसार भा.ज.पा., शिवसेना व एम.आय.एम. तर्फे संयुक्त स्वाक्षरीचे पत्र प्राप्त झाले असुन त्यानुसार महिला व बालकल्याण समिती सदस्य पदासाठी :,

भा.ज.पा. तर्फे प्राप्त झालेली नांवे :- १) सोनवणे कांचन विकास २) शिंदे गायत्री उत्तम ३) सपकाळे मिना धुडकू ४) चौधरी चेतना किशोर ५) बारी शोभा दिनकर ६) शेख हसीनाबी शरीफ ७) पाटील मिनाक्षी गोकुळ

शिवसेना तर्फे प्राप्त झालेली नांव :-. १) शेख शबानाबी सादीक २) भापसे जिजाबाई अण्णासाहेब

**मा.महापौर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्य नामनिर्देशित करणे कामी पक्षीय बलाबलानुसार गटनेत्यांकडुन मुदतीत महिला व बालकल्याण समितीवर पुढील प्रमाणे नऊ सदस्यांचे नामनिर्देशन करणे बाबतचे पत्र प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार खालील सदस्यांचे नामनिर्देशनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे व महिला व बालकल्याण समिती सदस्यपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) सोनवणे कांचन विकास | २) शिंदे गायत्री उत्तम | ३) सपकाळे मिना धुडकू |
| ४) चौधरी चेतना किशोर | ५) बारी शोभा दिनकर | ६) शेख हसीनाबी शरीफ |
| ७) पाटील मिनाक्षी गोकुळ | ८) शेख शबानाबी सादीक | ९) भापसे जिजाबाई अण्णासाहेब |

स्थायी समिती व महिला व बालकल्याण समिती सदस्याचे नामनिर्देशनास सभागृहाने मान्यता दिलेली असल्याने त्यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करते व त्यांना शुभेच्छा देते.

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
(**सिमा सुरेश भोळे**)
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका जळगांव**